RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ६] शुक्रवार, जानेवारी १५, २०१६/पौष २५, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, १० वा मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक १४ जानेवारी २०१६.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. २०१२/प्र.क्र. १९६/सेवा-२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्यामधील आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवेतील पोलीस शल्य चिकित्सक, गट-अ या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवेतील पोलीस शल्य चिकित्सक, गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०१६ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " पदवी " म्हणजे सांविधिक विद्यापिठाची पदवी ;

(ब) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. पोलीस शल्य चिकित्सक पदावरील नेमणूक पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) वैद्यकीय अधिकारी हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या आणि नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी या नियमातील उप नियम (ब) (*ii*) व (*iii*) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन गुणवत्ता या आधारावर योग्य व व्यक्तींच्या पदोन्नतीने,

किंवा

(ब) हे पद पदोन्नतीने भरता येत नाही अशा परिस्थितीत खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने —

(*i*) ज्याचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नाही :

परंतु, अगोदरपासून शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.



Scanned with CamScanner

(*ii*) ज्यांनी, एम.बी.बी.एस. पदवी धारण केली आहे किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) मधील प्रथम अथवा द्वितीय अनुसूचीमध्ये विहित केलेली अर्हता धारण केली आहे ;

(*iii*) ज्यांनी एम. डी. (फॉरेन्सिक मेडिसीन) ही पदव्युत्तर पदवी, किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) मधील प्रथम अथवा द्वितीय अनुसूचीमध्ये विहित केलेली अर्हता धारण केली आहे, किंवा भारतीय वैद्यक परिषदेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य अर्हता धारण केली आहे ; आणि

(*iv*) ज्यांनी या नियमाच्या उप नियम (*iii*) मधील अर्हता प्राप्त केल्यानंतर फॉरेन्सिक मेडिसीन या क्षेत्रातील पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतका अनुभव धारण केला आहे ;

किंवा

(ब) शासन सेवेत समकक्ष पद धारण करणाऱ्या व या नियमाच्या उप नियम (*ii*) व (*iii*) येथे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीने.

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. नियुक्त व्यक्तीने परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील, त्याने परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास अथवा तो पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो सेवा समाप्तीस पात्र राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसल्यास अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसल्यास. यासंबंधी विहित केलेल्या नियमानुसार त्याल सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीस जर आवश्यकता वाटली तर भारताच्या कोणत्याही संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात किंवा भारताबाहेर चार वर्ष/चार वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी (प्रशिक्षणासाठी व्यतीत झालेल्या कालावधी विचारात घेऊन) केंद्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींनुसार सेवा करणे आवश्यक राहील

परंतु असे की, अशा उमेदवारांच्या नियुक्तीपासून १० वर्षे कालावधीनंतर अथवा वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर अशी सेवा करणे आवश्यक राहणार नाही.

७. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवाराचे नाव कामावर रूजू होण्यापूर्वी महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९६५ खाली नोंदणी झाले नसेल अथवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ खाली ठेवण्यात येणाऱ्या वैद्यक परिषदेच्या नोंदवहीत नाव अगोदरच नोंदविलेले नसेल तर त्याला महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९६५ अन्वये नाव नोंदविणे आवश्यक राहील

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विवेक दहिफळे,

शासनाचे सह सचिव.

Scanned with CamScanner